## डॉ. रामभाऊ म्हसकर (अंमळनेर) सी. डी. लायब्ररी
## नियम व अटी

१. सभासद शुल्कः सी. डी. लायब्ररीचे सभासद व्हायचे असल्यास मासिक- रु. ६०/-, तिमाही- रु. १७०/-, सहामाही- रु. ३२०/- तर वार्षिक- रु. ६००/- एवढे शुल्क आकारले जाईल. (सी.डी.सी.च्या विद्यार्थ्यांकरता मासिक- रु. ४०/-, तिमाही- रु. १००/-, सहामाही- रु. २००/- तर वार्षिक- रु. ४५० /- एवढे शुल्क आकारले जाईल.)

२. अनामत शुल्कः रु. ५००/- असून सभासदत्व रद्द करावयाचे असल्यास, अनामत शुल्क परत दिले जाईल. त्या परिस्थितीत सभासदाला १५ दिवस आधी, तशी लेखी सूचना, कार्यालयात द्यावी लागेल.

३. सभासदाला एकावेळी जास्ती जास्त दोन सी.डी. दिल्या जातील. त्याचा कमाल कालावधी एक महिना इतका असेल. सी.डी.सी.च्या विद्यार्थ्यांकरता कमाल कालावधी १५दिवसाचा असेल. त्यानंतरच्या प्रत्येक दिवसाला रु.१०/- प्रमाणे विलंब शुल्क/ दंड भरावे लागतील. सी. डी. नेलेल्या दिवशीच बदलता येणार नाही.

४. सभासदाला सी.डी. संदर्भालयातून दिली जाईल. ती देताना आणि घेताना सी. डी. तपासली जाईल. सभासदाकडून सी. डी. परत आल्यावर सी. डी. खराब झाल्यास/त्यावर ओरखडे पडल्यास सी. डी. ची मूळ किंमत अधिक रु. १००/- वसूल केले जातील. सभासदाने सी. डी. हरविल्यास किंवा परत न केल्यास सी. डी. ची बाजारातील त्या वेळची किंमत अधिक रु. १००/- दंड म्हणून आकारले जातील.

५. परिषदेत येऊन सी.डी. पहायची असल्यास प्रत्येकी रु.१०/– पडतील. शाळा किंवा संस्थांमार्फत मुलांना सी.डी. विज्ञान परिषदेत येऊन पहायची झाल्यास, किमान २० जणांच्या गटाला प्रत्येकी रु. ५/– आकारले जातील. शाळांनी/संस्थांनी त्यापूर्वी सूचना दिल्यास किंवा वेळ ठरवून त्यासाठी शाळांनी/संस्थांनी आधी वेळ ठरवून घेणे आवश्यक आहे.

६. मराठी विज्ञान परिषदेच्या हिताच्या दृष्टीने, आवश्यकतेनुसार वरील पैकी कोणत्याही नियमांमध्ये बदल करण्याचा, नियम रद्द करण्याचा किंवा नवीन नियम लागू करण्याचा अधिकार परिषदेच्या कार्यवाहांना राहील.

७. परिषदेच्या कर्मचा-यांना सी. डी. लायब्ररी वापरायची असल्यास अनामत शुल्क किंवा वर्गणी भरावी लागणार नाही. परंतू त्यांना इतर सर्व नियम बंधनकारक असतील.

---------------